श्री सुरज् मनीराम चव्हाण विस्तार अधिकारी (कृषि)
पंचायत समिती अकोले यांचे गैरवर्तन प्रकारणी
कार्यवाही बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
कृषि विभाग
जा.क्र.कृषि/कार्या/१७४/२०२५
अहिल्यानगर दिनांक २१/०४/२०२५

संदर्भ:- १. या कार्यालयाचा तात्पुरत्या स्वरुपात दूर केलेचा आदेश क्र. कृषि/आस्था/३४९/२०१८ दि.१९/३/२०१८
२.या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक कृषि/आस्था/२१५/२०१९ दि.२१/०२/२०१९
३. श्री सुजर मीनराम चव्हाण यांचा खुलासा दि.१४/०३/२०१९
४.या कार्यालयाचा चौकशी अधिकारी नियुक्ती आदेश क्र. कृषि/आस्था/७१६/२०१९ दि.१९/६/२०१९
५.सहाय्यक आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा४/खाचौ/सी.आर.९१ दि.२०१९ दि.१६ एप्रिल २०२०
६. श्री सुजर मीनराम चव्हाण यांचा सेवेत पुन:स्थापित करणे बाबत अर्ज दि.२०/१०/२०१८
७.मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षेतेखाली वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांचे निलंबन आढावा समिती बैठक दि.१२/१२/२०१९ चे इतिवृत्त
८. या कार्यालयचा सेवेत पुन:स्थापित करणे बाबतचा आदेश क्र. कृषि/आस्था/१०२/२०२० दि.२७/०१/२०२०
९. मा.अति.सत्र न्यायाधिश कोर्ट नं.१ नांदेड यांचेकडील स्पे.केस नं.एसबी १४/२०१९ मधील निशाणी २७४ वरील आदेश दि.८/८/२०२४
१०. गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचे कडील क्र.वशि/आस्था१/२४६६/२०२४ दि.१५/१०/२०२४
११. मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.अहिल्यानगर यांचेकडील मंजुर टिपणी ९/१२/२०२४
१२. या कार्यालयाचे पत्र क्र.कृषि/आस्था / ०९/२०२५ दिनांक ६/१/२०२५
१३.ॲड.श्री प्रशांत साठे ,जिल्हा न्यायालय यांचा अभिप्राय दि.१३/०१/२०२५
१४.महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४

श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) पंचायत समिती कर्जत जि.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना त्यांचेविरुध्द पोलिस अधिक्षक गुन्हे अन्वेषण विभाग,छत्रपती संभाजीनगर यांचेकडील पत्र गु.अ.वि.तपास /२०१८/३३७ नांदेड दि.८/३/२०१८ नुसार व जा.क्र.पो.अ.(औ)गुअवि/तपास/२०१८२१९६ छत्रपती संभाजीनगर दि.२२/११/२०१८ नुसार गुन्हा रजि.न.२७/२०१६ कलम १६७,१७१,१९३,१९७,१९८, २०३,२१३,२१४, २१८,२२१,४२०,४१९, ४६७,४६८, ४७१, १२०(ब) ,३४ ,भादिवव भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम१९८८ चे कलम १३ (१) (अ),१३ (१)(ड) सह १३(२) ८ भ.द.वि या गुन्हयात दिनांक ६/३/२०१८ ते १२/३/२०१८ या कालावधील मा.न्यायदंडाधिकारी ,प्रथमवर्ग न्यायालय, किनवट जि.नांदेड यांनी श्री चव्हाण यांना पोलिस कष्टडी रिमांड दिल्याचे व १५/०३/२०१८ ते ८/८/२०१८ पावेतो न्यायालयीन कोठडीत असलेचे पोलिस अधिक्षक,गुन्हे अन्वेषण विभाग संभाजीनगर यांनी कळविले आहे. तसेच श्री चव्हाण यांना दिनांक ८/८/२०१८ रोजी मा.जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड येथून जामीन मंजुर झालेला आहे. त्यामुळे त्यांना दिनांक १९/०३/२०१८ अन्वये जिल्हा परिषद सेवेचे पदावरुन तात्पुरत्या स्वरुपात दूर केलेले आहे.

श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) यांचे गैरवर्तनाबाबत दिनांक २१/०२/२०१९ अन्वये दोषारोप बजाविण्यात आलेले होते. गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत यांनी दि. ५/३/२०१९ अन्वये श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ. (कृषि) यांना सदरचे दोषारोप बजावून सबंधिताची पोहच या कार्यालयास सादर केलेली आहे. तसेच श्री चव्हाण यांनी दि.१४/३/२०१९ रोजी या कार्यालयास खुलासा सादर केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

श्री सुरज मनिराम चव्हाण.वि.अ.(कृषि) यांचे १ ते ४ दोषारोप प्रकरणी दिनांक १९/६/२०१९ अन्वये सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. सहाय्यक आयुक्त. नाशिक यांनी त्यांचेकडील चौकशी अहवाल दिनांक १६ एप्रिल २०२० अन्वये इकडील कार्यालयास सादर केलेला आहे.

श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) यांना उपरोक्त दि.२७/१/२०२० चे आदेशान्वये त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना जिल्हा परिषदेच्या सेवेत समावून घेवून पंचायत समिती अकोले येथे त्यांना विस्तार अधिकारी (कृषि) या अकार्यकारी पदावर पदस्थापना देवून सेवेत पुन:स्थापित करणेत आलेले आहे.

श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) यांचे विरुध्द दाखल गुन्हयासंदर्भात मा.अति.सत्र न्यायाधीश कोर्ट नं.१ नांदेड यांचेकडील स्पे.केस नं.एसबी १४/२०१९ मधील निशाणी २७४ वरील आदेश दि.८/८/२०२४ अन्वये निकाल पारित केला असून सदर गुन्हयातून श्री सुरज मनिराम चव्हाण.वि.अ.(कृषि) यांची निर्दोष मुक्तता केलेली आहे. तसेच सदर प्रकरणी निकालाचे अनुषंगाने जिल्हा परिषदेचे विधी व न्यायिक सल्लागार यांनी सदर अपचारी श्री सुरज मनिराम चव्हाण यांना नमूद केल्याप्रमाणे गुन्हयातून व केसमधून मे.कोर्टाने डिसचार्ज/मुक्त केलेले असल्याने आपल्या स्तरावरुन योग्य निर्णय घेण्यास हरकत नसले बाबत संदर्भ क्र.१३ अन्वये लेखी म्हणणे सादर केलेले आहे.

सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद अहिल्यानगर सदर प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांना मा.अति.सत्र न्यायाधीश कोर्ट नं.१ नांदेड यांनी त्यांचेकडील स्पे.केस नं.एसबी १४/२०१९ मधील निशाणी २७४ अन्वये यांनी निर्दोष मुक्तता केल्याने श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) यांना शिस्तभंगविषयक कार्यवाहीतून दोषमुक्त करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री सुरज मनिराम चव्हाण.वि.अ.(कृषि) यांचे मुळ सेवापुस्तकांत घेणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक 20250421090011 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 15:37:47
(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) पंचायत समिती अकोले जिल्हा अहिल्यानगर

व्दारा,

गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोले

२/- सदरचा आदेश श्री सुरज मनिराम चव्हाण,वि.अ.(कृषि) यांना समक्ष बजावून सोबतच्या दुयम्म प्रतीवर त्याची त्याबाबतची स्वाक्षरी घेऊन इकडेस सादर करणेत यावी.

Scanned with OKEN Scanner